# भुयारी मेट्रोच्या चाचणीला सुरुवात

**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ मेट्रो ३ या पहिल्या भुयारी मेट्रो मार्गिकेवर मंगळवारी पहिल्यांदा मेट्रो गाडी धावली. सारीपूतनगर ते मरोळ नाका या ३ किमी अंतरावरील भुयारी मार्गावर ही गाडी धावली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मेट्रोला हिरवा झेंडा दाखविला. त्यामुळे मागील सहा वर्षांची मुंबईकरांची प्रतीक्षा आता संपुष्टात येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मेट्रो ३ मार्गिकेचा आरे ते बीकेसी हा पहिला टप्पा डिसेंबर २०२३मध्ये सुरू करण्याचे नियोजन मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) केले आहे. या मेट्रो मार्गिकेवर पुढील काही महिने गाडीच्या चाचण्या चालणार आहेत. यादरम्यान ही मेट्रो गाडी कमाल वेग मर्यादेने चालवून पाहिली जाईल. 'एमएमआरसीएल'कडून पुढील काही महिन्यांत ड्रायव्हिंग मोड टेस्ट, मध्यम आणि उच्च व्होल्टेज पडताळणी, एअरकंप्रेसर, ब्रेक, दरवाजे, वातानुकूलन यंत्रणा, प्रकाश आणि संकेत प्रणालीची चाचणी, प्रवासी उद्घोषणा, संपर्क आणि माहिती प्रणाली यांच्यासह ट्रॅक्शन आणि प्रोप्युलेशन आदी चाचणी घेतल्या जाणार आहेत. तसेच सारीपूतनगर येथील रॅम्प ते सहार रोडदरम्यानच्या मार्गावर चाचण्या पुढील काही महिन्यांनी घेतल्या जाणार आहेत.